# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

## (स्थानिक गुन्हे शाखा, सातारा)

**वेबसाइट - www.satarapolice.gov.in फॅक्स क्रमांक - ०२१६२-२३०२३२**

**मेल आय डी -pilcb.satara@mahapolice.gov.in दुरध्वनी क्रमांक- ०२१६२-२३३९२३**


**प्रेसनोट** दिनांक- १८/११/२०२५

(सातारा जिल्हयातील कराड शहर परिसरातील शरिराविरुध्दचे गुन्हे करणाऱ्या टोळीतील ०२ इसमांना सातारा पोलीसांनी सातारा,सांगली जिल्हा हद्दीतुन ०३ महिने केले तडीपार)

सातारा जिल्हयामधील कराड शहर परिसरातील सातत्याने शरिराविरुध्दचे गुन्हे करणारे सराईत टोळीचा प्रमुख १) गणेश शिवाजी काटकर वय -24 वर्षे, रा.मंगळवार पेठ,कराड ता.कराड जि. सातारा टोळी सदस्य २) प्रसाद उर्फ बाबु आनंद कुलकर्णी वय –27 वर्षे, रा. मंगळवार पेठ,कराड ता.कराड जि. सातारा यांचे टोळीवर खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत पोचवणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करुन दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन गर्दी मारामारी करणे, घरफोडी चोरी करणे, दंगल करणे यांसारखे दखलपात्र स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याने कराड शहर पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री.आर.ए.ताशिलदार यांनी सदर टोळीविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे संपुर्ण सातारा, सांगली जिल्हा हद्दीतुन तडीपार करणेबाबतचा प्रस्ताव हद्दपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक सातारा यांचेकडे सादर केलेला होता. सदर प्रस्तावाची चौकशी राजश्री सं. पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी कराड विभाग कराड यांनी केली होती.

कराड शहर पोलीस ठाणे हद्दीतील टोळी प्रमुख व टोळी सदस्य यांचेवर खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत पोचवणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करुन दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन गर्दी मारामारी करणे, घरफोडी चोरी करणे, दंगल करणे यांसारखे दखलपात्र यांसारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्यामुळे त्यांचेवर वेळोवेळी अटक तसेच प्रतिबंधक कारवाई करुनसुध्दा त्यांनी आपल्या टोळीने गुन्हेगारी कारवाया चालुच ठेवल्या आहेत. त्यांच्या टोळीवर कायदयाचा कोणताच धाक न राहील्यामुळे कराड तालुका परिसरातील लोकांना मोठया प्रमाणावर या टोळीचा उपद्रव होत होता, अशा टोळीवर कायदयाचा वचक राहवा याकरीता सर्वसामान्य जनतेतुन त्यांचेवर कडक कारवाई करणेची मागणी होत होती.

मा.तुषार दोशी, हद्दपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक सातारा यांचे समोर १) गणेश शिवाजी काटकर वय -24 वर्षे, रा.मंगळवार पेठ,कराड ता.कराड जि. सातारा टोळी सदस्य २) प्रसाद उर्फ बाबु आनंद कुलकर्णी वय –27 वर्षे, रा. मंगळवार पेठ,कराड ता.कराड जि. सातारा यांची सुनावणी होवुन सदर टोळीस महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अन्वये संपुर्ण सातारा, सांगली जिल्हा हद्दीतुन तीन महीने हद्दपारीचा आदेश पारीत केला आहे.

सातारा जिल्हयामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याकरीता आगामी नगरपालिका, नगरपंचायत निवडणुक काळात सातारा जिल्हयातील सराईत गुन्हेगारांचेविरुध्द हद्दपारी, मोक्का, एमपीडीए अशा प्रकारच्या कडक कारवाया करणेत येणार आहेत.

या कामी हद्दपार प्राधिकरणापुढे सरकार पक्षाच्या वतीने श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे श्री अरुण देवकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा, पो.हवा प्रमोद सावंत, अमित सपकाळ, राजु कांबळे, शिवाजी भिसे, म.पो.कॉ.अनुराधा सणस कराड शहर पोलीस ठाणेचे पो.हवा सज्जन जगताप, पोकॉ आनंदा जाधव, मपोकॉ सोनाली मोहीते यांनी योग्य पुरावा सादर केला आहे.

---

प्रति :- संपादक ---------- पोलीस अधिक्षक सातारा करीता

आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द व्हावे.